सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४
e mail–desk4a@dtemaharashtra.gov.in,website: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्र. ४/आस्था/डॉ.जे.पी.ना.रा.शि.पु./२०२६/१२१ दिनांक : 10 APR 2026

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर,
अमरावती व नागपूर.

**विषय : सन २०२५-२६ या वर्षासाठीच्या "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करण्याकरीता निर्धारीत निकष व अटींची पुर्तता करणाऱ्या अध्यापकांनी माहिती सादर करणेबाबत...**

संदर्भ : १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/ प्र.क्र.८९/समन्वय, दिनांक ०५ सप्टेंबर २०२५.

२. शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. क्र. पुरस्कार-२०२५/CN-१०६४२/प्र.क्र.८९/समन्वय, दिनांक १६.१०.२०२५

३. संचालनालयाचे परिपत्रक क्र.४/आस्था/डॉ.जे.पी.ना.रा.शि.पु./२०२५/३९०, दि.१७.१०.२०२५

४. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) यांचे पत्र क्रमांक उशिस-२०२५-शिक्षक पुरस्कार/प्रशा-३/ ई-२५१२३३४, दिनांक २४.०३.२०२६

उपरोक्त विषयांकीत संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत, बहुमोल शैक्षणिक योगदान देणाऱ्या प्राचार्य / शिक्षक यांना "डॉ.जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" प्रदान करणेबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली असून संदर्भ क्रमांक २ अन्वये पुरस्कार प्रदान करण्याबाबतच्या निवड प्रक्रियेच्या खालील कार्यक्रमास मान्यता प्रदान केलेली आहे. सोबत संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णय व संदर्भ क्रमांक २ मधील शासन परिपत्रक संचालनालयाच्या संदर्भ ३ मधील परिपत्रकासोबत संलग्न केलेले आहेत, त्यांचे अवलोकन करावे.

२. संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त खालीलप्रमाणे पुरस्कार निश्चित करण्यात आले आहेत -

I. राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदवी / पदव्युत्तर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथील ०२ शिक्षक.

II. राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने येथील शिक्षक तसेच औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदविका) यामधील ०३ शिक्षक.

३. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या पुरस्कारांच्या संख्येच्या मर्यादेत शिक्षकांची निवड करण्यासाठी शासन निर्णयात नमूद केलेल्या खालील प्राथमिक अटींची पूर्तता करणारे शिक्षक "डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार" यासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

I. शासनाने विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्ती झालेले शिक्षक

II. शिक्षकाने नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले प्रतिनियुक्तीवर आहेत असे शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील.

III. शिक्षकाने कमीत कमी १५ वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी.

IV. सेवानिवृत्त झालेले शिक्षक डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

V. विभागीय चौकशीत दोषी आढळलेले, विभागीय चौकशी प्रलंबित असलेले शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील.

VI. शिक्षकाविरुद्ध फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा.

VII. शिक्षक खाजगी शिकवणी करीत नसावा.

VIII. प्राथमिक अटीचा भंग झाल्यास, पुरस्कार व त्याअनुषंगिक सोयी-सुविधा परत घेण्यात येतील व संबंधितांवर उचित कारवाई करण्यात येईल.

४. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णय त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदवी/पदव्युत्तर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे तसेच सर्व शासकीय तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम संस्था (पदविका) यांना अग्रेषित करावा. सदर शासन निर्णय संबंधित संस्था प्रमुखांनी त्यांच्या संस्थेतील प्राथमिक अटींची पूर्तता करणाऱ्या शिक्षकांच्या निदर्शनास आणून, संबंधित शिक्षकांकडून शासन निर्णयात नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांसह व मूल्यांकनासाठी निर्धारीत निकषांनुसार अर्ज / प्रस्ताव दि. २४.०४.२०२६ पर्यंत प्राप्त करुन घेण्यास संबंधित संस्था प्रमूखांना आपले स्तरावरुन सूचित करावे. तसेच संस्था प्रमूखानी त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज आपले कार्यालयास दि. २७.०४.२०२६ रोजी जमा करण्यास सूचित करावे.

५. परिच्छेद क्रमांक ४ नुसार प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या अर्जातील / प्रस्तावातील माहितीची तपासणी करून, आपल्या विभागीय कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षकांची संपूर्ण माहिती **सोबतच्या विवरणपत्र अ व ब** मध्ये भरून माहितीच्या समर्थनार्थ समर्पक कागदपत्रांची सत्यप्रतीसह दि. **२९.०४.२०२६** रोजी निश्चितपणे या संचालनालयास द्विप्रतीत सादर करावी. सदर विवरणपत्रात शिक्षकांनी नमूद केलेली माहितीचे कागदपत्रांवरुन पडताळणी केली असून ती अचूक व असल्याचे प्रमाणपत्र संस्था प्रमूख व विभागीय सहसंचलाकांनी त्यांचे पत्रासोबत स्वतंत्र देण्यात यावे. **तसेच विवरणपत्र अ व ब** मध्ये मधील रकानानिहाय कागदपत्रांचा एकत्रित संच व त्यावर पृष्ठ क्रमांक देण्यात येवून आवश्यक तेथे पताका लावण्यात याव्यात. तद्नंतर सोबतच्या **विवरणपत्र क** मधील नमुण्यात अनुक्रमणिका तयार करून ती कागदपत्रांच्या संच्याच्या पृष्ठभागावर लावण्याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे विवरणपत्रातील माहिती "Sakal Marathi" या फॉन्टचा वापर करून Excel फाईल स्वरूपात तयार करून desk4@dtemaharashtra.gov.in या ई-मेलवर पाठवावी. संचालनालयास दि. २९.०४.२०२६ नंतर प्राप्त झालेली माहिती विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर
प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी -

१. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड
२. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, शासकीय व शासन अनुदानित स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये
३. प्राचार्य /संचालक, सर्व शासकीय व अनुदानित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, स्वायत्त औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
४. प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने,औषधनिर्माण संस्था (पदविका)
५. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई- त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
६. कार्यासन क्रमांक ४अ, मुख्य कार्यालय, मुंबई

## विवरणपत्र "अ"

| अ.क्र. | अध्यापकाचे नाव, पदनाम, संस्था | जन्मदिनांक | शैक्षणिक अर्हता | नियमित नियुक्तीचा दिनांक, (शासन निर्णयासह) व एकूण सेवा कालावधी / एकूण सेवेपैकी अध्यापकीय सेवा कालावधी | परिविक्षा कालावधी पूर्ण केला आहे किंवा कसे? (शासन निर्णयासह) | गोपनीय अहवालाची प्रतवारी/गुणांकन (सन २०२०-२१ ते सन २०२४-२५) | अध्यापना व्यतिरीक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्ती वर गेले होते कां ? | डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य पुरस्कात यापुर्वी प्राप्त झाला आहे का? | विभागीय चौकशीत दोषी आढळले आहेत का/विभागीय चौकशी सुरु आहे/प्रलंबित आहे/प्रस्तावित आहे याबाबतची माहिती | अध्यापका विरुद्ध फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली आहे का? तसेच पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला आहे का? | संबंधित शिक्षक खाजगी शिकवणी घेत आहे किंवा कसे? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## विवरणपत्र "ब"

| अ.क्र. | अध्यापकाचे नाव, पदनाम, संस्था | शिक्षकाने त्याच्या विषयात प्रकाशित केलेल्या शोध निबंधाची माहिती | | शिक्षकाने विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रमाची माहिती | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | एन.बी.ए./नॅक मानांकनाकरीता सहभागाची माहिती | .प्रयोगशाळेचा विकासाबाबतची माहिती | अध्यापक विकास कार्यक्रम/ कार्यशाळा / परिषदा इ. चे आयोजनाबाबतची माहिती | नाविन्यंपुर्ण विशेष शैक्षणिक / संशोधनात्मक कमिगिरी बाबतचा तपशील | अभ्यासक्रम विकास कार्याचा तपशील | उत्कृष्टता केंद्र- (COE)- च्या उभारणीस सहभागाचा तपशील | एन.आय.आर.एफ. प्रतवारी सुधारणेचे प्रयत्नाबाबतची माहिती | सामाजिक दायित्व, उद्योग-संस्था समन्वयातून संस्था/महाविद्यालय विकासाकरिता CSR/महसूल निर्मितीबाबतचा तपशील |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

| | | विवरणपत्र "ब" | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अध्यापकाचे नाव, पदनाम, संस्था | अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे ५ वर्षातील वर्षनिहाय प्रमाण | पी.एच.डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण आहे किंवा कसे? असल्यास तपशील | पी.एच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याचा तपशील | अध्यापन क्षेत्रामध्ये केलेले संशोधन कार्य, शोधनिबंध व त्याची प्रसिद्धी याबाबतचे माहिती | | | आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर/प्रसिद्ध केलेले संशोधनपर पेपर्स | सेमिनार, परिषद आणि कार्यशाळा येथील सादरीकरण | संस्था प्रमूखांचे अभिप्राय | विभागीय सहसंचालकांचे अभिप्राय |
| | | | | | अर्थसहाय्यीत प्रकल्पातील सहभाग | नोंदणीकृत पेटंटस - | पुस्तक प्रकाशन | | | | |
| १ | २ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

राज्य शिक्षक पुरस्कार २०२५-२६

विवरणपत्र

अध्यापकाचे नाव, पदनाम, संस्था:

| अ.क. | निकष | मुल्यांकनाचे उपघटक | संख्या | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | जन्मदिनांक | सेवापुस्तकाचे पहिल्या पानाची साक्षांकीत प्रत | लागू नाही | |
| २ | शैक्षणिक अर्हता | शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रांची साक्षांकीत प्रत | लागू नाही | |
| ३ | नियुक्तीचा दिनांक | नियुक्ती आदेशाची साक्षांकीत प्रत | लागू नाही | |
| ४ | परिविक्षा कालावधी | परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचा शासन निर्णयाची साक्षांकीत प्रत | लागू नाही | |
| ५ | गोपनीय अहवाल प्रतवारी / गुणांकन | सन २०२०-२१ पासून सन २०२४-२५ पर्यंतच्या गोपनीय अहवालांच्या साक्षांकीत प्रती | लागू नाही | |
| ६ | अध्यापना व्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्ती | प्रतिनियुक्ती आदेशाची साक्षांकीत प्रत | लागू नाही | |
| ७ | डॉ. जे.पी. नाईक राज्य पुरस्कार यापूर्वी प्राप्त झाला आहे का ? | होय किंवा नाही | लागू नाही | |
| ८ | विभागीय चौकशीत दोषी आढळले आहेत का/ विभागीय चौकशी सुरू आहे /प्रलंबित आहे/प्रस्तावित आहे | संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र | लागू नाही | |
| ९ | अध्यापका विरुध्द फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली आहे का ? तसेच पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला आहे का? | संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र | लागू नाही | |
| १० | संबंधित शिक्षक खाजगी शिकवणी घेत आहेत किंवा कसे? | संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र | लागू नाही | |
| ११ | अध्यापन विषयात प्रसिद्ध शोध निबंध ( in Journal ) | आंतराराष्ट्रीय स्तर- | | |
| | | राष्ट्रीय स्तर- | | |
| १२ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | १.एन.बी.ए./नॅक मानांकनाकरीता सहभाग | | |
| | | २.प्रयोगशाळेचा विकास | | |
| | | ३. अध्यापक विकास कार्यक्रम/ कार्यशाळा / परिषदा इ. चे आयोजन | | |
| | | ४. नाविन्यपुर्ण विशेष्ज्ञ शैक्षणिक / संशोधनात्मक कमिगिरी | | |
| | | ५. अभ्यासक्रम विकास | | |
| | | ६.उत्कृष्टता केंद्र-(COE)- च्या उभारणीस सहभाग | | |
| | | ७.एन.आय.आर.एफ. प्रतवारी सुधारणेचे प्रयत्न | | |
| | | ८.सामाजिक दायित्व, उद्योग-संस्था समन्वयातून संस्था/महाविद्यालय विकासाकरिता CSR / महसूल निर्मिती. | | |
| १३ | अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे ५ वर्षातील वर्षनिहाय प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | १. ८० ते ९० % | | |
| | | २.९० ते ९५ % | | |
| | | ३. ९६ ते १०० % | | |

| अ.क. | निकष | मुल्यांकनाचे उपघटक | संख्या | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १४ | पी.एच.डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण आहे किंवा कसे? | होय किंवा नाही | | |
| १५ | किती विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शन केले. (किमान २ विद्यार्थ्यांना आवश्यक) | ------------------------ | | |
| १६ | अध्यापन क्षेत्रामध्ये केलेले संशोधन कार्य, शोधनिबंध व त्याची प्रसिद्धी याबाबतचे माहिती | १. अर्थसहाय्यीत प्रकल्पातील सहभाग - | | |
| | | २. नोंदणीकृत पेटंटसची संख्या - | | |
| | | ३. पुस्तक प्रकाशनाची संख्या - | | |
| १७ | आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर/प्रसिद्ध केलेले संशोधनपर पेपर्स | **सेमिनार, परिषद आणि कार्यशाळा येथील सादरीकरण:**<br>१.आंतरराष्ट्रीय - | | |
| | | २. राष्ट्रीय - | | |
| एकूण पृष्ठे | | | | |